स. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९२
९८३०



खरवली येथील,

# ॐकार मेळ्याचीं

# निवडक पदें. भाग-- १ ला.

संस्थापक व कवि—

**डॉ० सदाशिव श्रीधर करमरकर**

सं. सुमसंग्राम, सोज्वळ-संसार, सुंदरसूड, सौजन्यसंपात, कर्मकंकण इत्यादि नाटकांचे व मा० नाना शंकरशेट चरित्रसार वगैरेचे कर्ते.

—×—


(... कर्त्याचे स्वाधीन.)

REFBK-0004252
REFBK-0004252
४२५२

सन १९३० ] [ किम्मत ३ आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे
मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

# ॐ कार मेळा, खरवली.



# हृदय

शके १८४९ च्या जेष्ठामध्यें खरवली ता. माणगांव मुक्कामीं व्यवसायार्थ रहावयास आल्यापासून, येथें कांहींतरी लोकशिक्षणाचें काम हातीं घेऊन यथाशक्ति समाजसेवा करावी, असें मनांत घोळत होतें. लवकरच श्रीमंगलमूर्तीचा शुभसण येणार होता; म्हणून तन्निमित्त प्रथम मेळा तयार करून नंतर सार्वजनिक उत्सव सुरू करण्याचें योजिलें. या योजनेंत लोकमान्य राष्ट्रीय विभूतींचे अनुकरण करून त्यांच्या पावलांवर पावलें टाकीत जाण्यापेक्षां माझें स्वतःचें असें निराळें कांहींच नव्हतें; परंतु या प्रकारास अगदींच अनभ्यस्त अशा येथील अशिक्षित ग्रामस्थांच्या हें कितपत पचनी पडेल याची मला जबरदस्त शंकाच होती !

पण श्रीच्या कृपेनें तशा विशेष अडचणी न येतां, असल्या परिस्थितींत व स्वतांच्या व्यवसायापुढें अगदींच थोडी फुरसद मिळाली असतांही, संकल्पित योजनेस उत्तम प्रारंभ झाला. दुसरे वर्षीं सदर कार्यास मूठभर अहंमन्य लब्धप्रतिष्ठितांकडून निष्कारण त्रास पोंचला, हें जरी खरें असलें, तरी एकंदर परिणाम पहातां त्यावर्षीं व तदनंतर आजपर्यंत सर्व तऱ्हेच्या अनेक अनपेक्षित दिव्यां-तून पार पडत येथील *ॐकार मेळा* आज हें चौथें वर्ष पहात आहे; आणि त्या सर्व शक्तिमान प्रभूच्या कृपेनें आलेल्या अनेकविध अडथळ्यांपासून यास कांहींच धोका न पोचतां, उलट त्याचें सौंदर्य दिवसें दिवस वाढतच आहे.

शिवाय पुष्कळ दिवस मनांत बाळगीत असलेल्या उत्कट आशा—म्हणजे पद्यावली छापविणें, मेळ्याचें छायाचित्र ( फोटो ) काढविणें आणि मुलांचा पोषाख एकवर्णी ( युनिफॉर्म ) बनविणें याही पुऱ्या होण्याचा योगायोग आज येत आहे; हा या चौथ्या वर्षाचा विशेष होय. मात्र या सर्व गोष्टी मनाप्रमाणें घडून येण्यास येथील बहुजन समाजानें माझ्या ठायीं प्रकट केलेलें निर्व्याज प्रेमच कारणीभूत झालें असल्यामुळें, येथील जनता जनार्दनाचा याबद्दल मी किती ऋणि आहें, हें शब्दानें सांगण्यास ही लेखणी असमर्थ आहे !

शेवटीं साधुवर्य तुकाराम महाराजांच्या शब्दांतच त्या मंगलमय प्रभूची निरंतरची प्रार्थना करून हें हृदय निवेदन आटोपतें घेतों !

तुझा म्हणविलों दास, । केली उच्छिष्टाची आस; ॥
मुखिं घालावा कवळ, । जरि तूं होसी कृपाळ; ॥
शीणभाग माझा पुसे, । तुका म्हणे न करी हांसे. ॥

मिती भाद्रपद
शुद्ध ४ थी
शके १८५२

—सर्वांचा नम्र—

सदाशिव श्रीधर करमरकर.

REFBK-0004252
REFBK-0004252

॥ श्री ॥

खर्वली येथील

# ॐकार मेळ्याचीं

# निवडक पदें.

संस्थापक व कविः—सदाशिव श्रीधर करमरकर.

## पद १ लें.

( चालः—साम्य तिळही नच० । )

ॐ जय जय श्री मंगलवेशा ! ॥ प्रणाति प्रथम तुज, हे परमेशा ! ॥ धृ० ॥ तूं सुखकर्ता, तूं दुःखहर्ता, तूं धनदाता; ॥ तुजविण आणिक न तारक देशा ॥ १ ॥ तूं गुणशाली, तूं जनवाली, प्रेमळ माता, ॥ ज्ञानाचा तूं सागर केवळ मोक्षद ऐशा ॥ २ ॥ निर्गुणरूपीं, तूं चित्स्वरुपीं असतां, धरिशी ॥ शिवकवि हृदया सुखकर व्हाया, सुंदर भूषा ! ॥ ३ ॥

## पद २ रें.

( चालः—बोल बोलूं न दे मी० । )

प्रथम वंदीन ईशा, सुरेशा, । हे दुरितनाशा; ॥ प्रेमरंगींच दासा, सुखाशा । दे श्रीगणेशा ! ॥ धृ० ॥ भक्तजना दिसतोसी मंगल, ॥ पूर्ण तयांची झणिं होत फलाशा. ॥ १ ॥ मूढमती सैतानासम जे,

दंडुनि त्यांची फसवीशी दुराशा ॥ २ ॥ संतजना संसारीं सुंदर। दाविशि निशिदिनि गुणबोध प्रकाशा ॥ ३ ॥

## पद ३ रें.

( चालः—जय जगदीश हरे० । )

प्रभो ! जय मंगलधाम ! ॥ विघ्न विनाशुनि, त्वरित करिशि जो सफल सुकाम; प्रथम क्षणीं तुज स्मरुनि शिवकवी करित प्रणाम ॥ ध्रु० ॥ दुष्ट-कपट-कृति विरुनी, ॥ सुजन जया पावे; ॥ असुरि तमा हरुनी, ॥ सात्विक–रवि उगवे; ॥ तरि अवतार तुझा हा सार्थ, जिवां विश्राम ! ॥ १ ॥ कृत-त्रेता-द्वापारीं कलियुगीं तेवि तरी ॥ भक्त तुझा नच कधिंही ॥ कार्य–विनाश वरी; महतिच थोर धरी ही ॥ मुनिगण स्तुत तव नाम ! ॥ २ ॥

## पद ४ थें.

( चालः—गोपाल कृष्ण भगवान० । )

या, भरवुं संतदरबार ॥ प्रभूच्या पाशीं ॥ ध्रु० ॥ मंगलमूर्ति आसनिं राजे, ॥ सुखसोहाळा, पुढति विराजे, ॥ आम्ही होऊं सर्व सरदार ॥ १ ॥ मंगल, सुखकर, दाता, प्रेमळ ॥ राजा आमुचा माता केवळ ! ॥ त्या देउं प्रेम करभार ॥ २॥ प्रभुच्यापाशीं भेद न कोठं, ॥ हीन, मूढ जो चरणीं लोटे ॥ त्या सौख्य होय अनिवार ॥ ३ ॥ आप-पर भावा विसरुनि; आतां ॥ जाति गोतिचा सोडुनि गुंता, ॥ घेऊं खरा आधार ॥ ४ ॥ प्रभुरायाचें राज्य फुकाचें ॥ शिवकवि मानी मुक्त मनाचें ॥ त्यांत पूर्ण उद्धार ॥ ५ ॥

## पद ५ वें.

( चालः—बाळा जो जो रे० । )

हार मी गुंफितसें, । प्रभुराजा, ॥ अश्रूंचा हा माझ्या ! ॥ धृ० ॥ कितीएक दास तुझे । तुज वहाती सोनें, माणिक, मोतीं; ॥ असेल थोर जरी । त्या मोल, ॥ अश्रू हे बिनमोल ! ॥ १ ॥ कुणि शतरंगाच्या फुलमाळा ॥ वहातिल तुज वेल्हाळा; ॥ परि तीं खुडिलिं फुलें ! दुसऱ्याचीं॥ आंसवें माझीं, माझीं ! ॥ २ ॥ घालुनि हारांचें । तुज ओझें ॥ झांकिति हृदयचि तुझें; ॥ उघडुनि हृदयाला । परि न्हाणीं ॥ डोळ्यांतिल हें पाणी ! ॥ ३ ॥ नवविध भक्तांना । पहातां या, ॥ रंगुनि जाशिल देवा; ॥ शिवकविचीं आंसवें । परि बघतां, ॥ पाझर फुटतिल चित्ता ! ॥ ४ ॥

## पद ६ वें

( चालः—फुरकते जानासे० । गजल )

मातृभूमि वंदुनिया, राष्ट्रसंता नमुं आतां, ॥ राष्ट्रकार्यीं तनुमनें वा अर्पिती जे जनहिता ॥ ध्रु० ॥ म्लेंच्छराज्यीं घोर माजे धर्मग्लानी, पिशुनता; ॥ करुनि क्रांती कष्टवीती देह, शांती स्थापितां, ॥ श्रीसमर्था नमन पहिलें, मुक्त योगी जे स्वतां ॥ १ ॥ हिंदुयाती गोधनें तीं गांजिलेलीं दीसता, ॥ सिंह नादें गर्जुनीयां, दास्यबेडी तोडिता ॥ विजयि शिवराज हो प्रतापे; नमनिं वाटे धन्यता ॥ २ ॥ दैव फिरलें राज्य गेलें, धनि मिळाले इंग्रजी ॥ संस्कृतीही पलट घेई, करित जनता भग्न जी ॥ काळ तैशी बसविण्या घाडि, करिति नाना कुशलता ॥ ३ ॥ सिंह सांपाळिं सांपडे तों, शिशु खडे की मारिती; ॥ परि तयांची सिद्ध

करिती रानडे ती शुद्धता ॥ ४ ॥ दास्य पंकीं रुतुनि गेली, मूक झाली जी प्रजा, ॥ वाणि था या मागणीसी स्पष्ट, राष्ट्रीं नवसभा ॥ स्थापि दादाभाई शिणुनी, ऋषिच बोधी शुभकथा ॥ ५ ॥ पराकि माया पाहुनीयां, स्वाकिय जन ते भाळती, ॥ प्रखरवाणी चिपळुणी मग विष्णुशास्त्री तयिंविता, ॥ सत्य ज्ञानें, स्वाभिमानें जागविलें जनमता ॥ ६ ॥ "राजमंत्रीं, पारतंत्रीं देश माझा बुडविता !" ॥ म्हणुनि फोडी हांक, मोडी खोड रिपुची झगडतां; ॥ स्फुरण य त्या टिळक कुळिंच्या लोकमान्या वंदितां ॥ ७ ॥ दुष्टसंगें सुष्ट गोष्टी, शठिं नियोजी सत्यता ॥ शस्त्रा टाकुनि शस्त्रधारी रडविले हो रोधिता ! ॥ प्रबल गांधी नवल करिती, भीति शमली तत्वतां ॥ ८ ॥ स्वार्थत्यागा स्फुरण जधिं ये, धुरिण त्यांची वळली गी, कर्ण लाजों ऐशि कृति जो निज सुदानें करि जगीं, ॥ दास पुण्यें चढवि विभवा राष्ट्रकाजा नमन त्या ॥ ९ ॥ धर्मि हल्ले फार झाले, ये समाजा क्षीणता, ॥ आर्यधर्मी शुद्धिकर्मीं दिननिशीही झुंजतां, ॥ स्वामि श्रद्धानंद कामीं येति, त्यांते नमुं अतां ॥ १० ॥ हिंदभूच्या महातिसाठीं तळमळे जो दिन किती ॥ शील सोडीनाच लाला हृदय देई रिपु हतीं, ॥ राखण्यातें सत्व जेवीं, मांस देई शिबि स्वतां ॥ ११ ॥ बंदिवासीं न्याय नाहीं, विषमताही थोर ती ॥ पाहुनियां, ठेवि देहा अन्नत्यागें असिव्रतीं, ॥ त्या जतिंद्रा नमन माझें, अतुल ज्याची प्रखरता ॥ १२ ॥ पामरें म्यां किति वदावी पुण्य नामावलि अशी, ॥ स्मरण या या सकळिकांचें माति अपूरी मशीं, ॥ कांहिं वदलों कितिक चुकलों, नमि क्षमेसी याचितां ॥ १३ ॥ सकल जल तें सागराला, नमन अवघें ईश्वरा, ॥ सकल विभुती एक होती, त्यागितां स्थूल शरिरा, विश्वरूपचरणिं म्हणुनी ठेवि माथा हा अतां ॥ १४ ॥

## पद ७ वें

( चालः—कंगणिदार भरजरी० । पोवाडा )

गुणी शाहिरा बांधुनि कमरा, व्हावें तयार ॥ आतां राव० ॥ शिवराजाचा प्रताप गाया, कवनाचा बहर ! ॥ ध्रु० ॥ अवरंगजेबापाशीं बाबा लोक थोर थोर, खान शाहिस्ते त्यामधिं मोठा काळ भयंकर; ॥ विडा पैजेचा उचलुनि साचा दरबारी, नीट ॥ शिवबा धरण्या आपण धरि तो दख्खनची वाट. ॥ पुणेंमुलुखीं तळ देउनि कीं; बसला डौलांत ॥ खुद्द रायाच्या वाड्यामाजीं जाहिर शहरांत; ॥ गनिम तुफानी घरांत शिरुनी, घाली थैमान, ॥ शिवाजि केसरी कोंडाण्यावरि झाला बेभान ! ॥ मसलत केली शिवप्रभूनें कीं, खान बिलंदर; । माय भवानी कौल देतसे, 'जावें हुश्शार.' ॥ त्याच वाटेनें जाइत होता लग्नाचा नवरा; ॥ लगिनवराढी आपण बनुनी शिव येती शहरा, ॥ गुपचुप वसती करूनि, राती छापा घातीला ॥ खानाच्या तें बाया मारिति हांका 'अल्ला अल्ला !' ॥ तिरपिट झाली लोकांची, मग खानहि भेदरला; ॥ लगबग करुनी चिरडि नेसला; बुरखा पांघरला ! ॥ भेदक डोळे शिवसिंव्हाचे, खान ओळखीला; ॥ घाव घातिला, हातावरती तो चाटुन गेला, ॥ बोबडि वळली, खिडकीखालीं खान उडी घाली, ॥ 'तोबा तोबा' करितां, त्याला भुइ थोडी झाली ! ॥ धीरवीर ते शिवाजिराजे, प्रताप गाजे चौफेर; ॥ शिवकवि सांगे एक मात, परि किति झडली फेर ! ॥

## पद ८ वें

( चालः—ही दिसे छबि० । )

विश्वसखा जगीं भरुनी, भुलवी, ॥ नयना रिझवी, हृदया रमवी; एक तनू परि बहुविध नटवी ! ॥ धृ० ॥ मोहन बांसरि अधरीं

गोजिरी, ॥ स्वर सुंदर तो तहान न पुरवी ॥ १ ॥ भक्तिसुधारस लंपट भ्रमरा ॥ विराटप्रभुचें रूप दचकवीं. ॥ २ ॥ रूपमोहनी नयनिं तरंगुनी, ॥ रजनीदिनिं, गडे, फसवी, हंसवी. ॥ ३ ॥

## पद ९ वें.

( चालः—तूं टाक चिरुनि० । )

या धर्मिं सनातनता । पुरी असतां, ॥ धर्मांत संकुचित मता घुसडुनी, घात कसा आणिता ? ॥ ध्रु० ॥ आर्यांनों उघडा डोळा, । उपनिषदें, वेदहि चाळा । मग उमजे सगळा ताळा, ॥ 'हा क्षुद्र बाटगा भकतो, ' म्हणुनी राग नको नुसता ! ॥ १ ॥ मार्तंडाचि बनले धर्मी, पाखंडी परि ते कर्मी, । दंभाची आणुनी उर्मी, ॥ शास्त्रा फिरविति अर्थ काढिती बुद्धि विरुद्ध स्वतां ! ॥ २ ॥ धर्माच्या नांवें कोणी, । धर्मावर ओतुनि पाणी, । उकळाया सगळें लोणी, ॥ उपदेशी जन, कथुनि पुराणें, ज्यास नसे पत्ता ! ॥ ३ ॥ हा एक मत्सरीं जळतो, । दुसऱ्यांच्या घातें निवतो, । ग्रामण्य आणाया टपतो, । काक दृष्टिचा, धर्मविटंबनिं जमवि खुळया गोता ! ॥ ४ ॥ हा कोणी मानी मोठा, । परि कृतिचा निव्वळ खोटा, । सत्तेचा मिरवी सोटा, । स्वार्थि, भेंकडा खूप दटावुनी, धार्मिक हो पुरता ! ॥ ५ ॥ हा एक मारुनी डल्ला, । सोन्याचा जमवी गोळा, । पुसुं नये कुणी हें त्याला, । म्हणुनि धर्म करि, प्रायश्चित्त वरि, शुद्ध म्हणे आतां ! ॥ ६ ॥ हा दुसऱ्या म्हणतो 'बाट्या ' । परि करणी करि उफराट्या, । जिव्हेवर उठतां लाटा । धर्म आपुला ठेवि खुंटिला, मारि दुजा बाता ! ॥ ७ ॥ याचाहो कावा नंगा; । घाली हा नुसता पिंगा; । जातींचा माजवी दंगा, । 'खुळें' म्हणे 'जग' सत्य आम्हिच कीं ! धर्म अम्हां करितां ' ॥ ८ ॥ हा निंदक वैदिक धर्मा, । हिंदूंच्या बुडवी कर्मा, । परि काढि न कोणी

वर्मा, । सत्ता वैभव संपत्तीच्या गोड जगीं लत्ता !॥ ९ ॥ सज्जन हो, बाजू दुसरी । पाहुनि घ्या आतां चतुरी, । प्रामाणिक बुद्धिसि फितुरी । ना मुळिं करितां, न्याय कोणता सत्य गमे चित्ता ? ॥ १० ॥ अन्नान्न दशा जगिं झाली, । लाचारी अतिशय आली, । परधर्मी-पसरूनि जाळीं । त्यास नाडिती, घ्या ना मागुति परि ताप तया होता !॥ ११ ॥ जो मुळिंचा हिंदुच होता, । हिंदुंच्या धर्मा स्मरतां, उसळी ये अजुनी रक्ता, । त्यास कोंडुनी शठें जबरिंनीं बाटवितां!, त्याजिता !॥ १२॥ हा महार भंगी दुसरा, । पाणवटीं त्या नच असरा, । देऊळीं समीप न थारा, । देव फोडि जो त्याहुनि हा कां नीच गमे स्वमतां ? ॥ १३ ॥ सांप्रत या जीवन कलहीं । वृत्ती नर बहुविध घेई, । परि अंतरिं शुद्ध असाही ॥ येतां जवळी, काढुनि कवळी दूषवितांचि वृथा ! ॥ १४॥ तो धर्म सनातन कसला, । अन्नें जो वितळुनि गेला, । पाण्यानें भ्रष्टाचि झाला !॥ वक्तावरती नजर द्या तरी; सोंग पुरें आतां ! ॥ १५ ॥ जो धर्म अखंडित चाले, । त्या नांव सनातन आलें, । कुणि त्यासी कुंठित केलें, । राहि न कोंडुनि फोडि बांध झणिं आर्य मनें स्फुरतां !॥ १६ ॥ किति समाजिं शकलें झालीं, । तीं सांधुनि घेणें पहिलीं, । तत्वांशीं गाठ न घाली ॥ पोपट-पंची शिकुनि शास्त्र तो, मूर्ख खराच रिता ?॥ १७॥ जगिं समाज सुदृढ बनुनी, । निज तेजें तळपों भुवनीं, । धर्माचें बंधन म्हणुनी, ॥ घालिती मुनि ते, सांगत होते 'धर्मस्य गतिः त्वरिता.' ॥ १८ ॥ यास्तव ही एक विनंति, । अति त्याची होते माती; । तरि विवेक ठेवुनि चित्तीं ॥ शब्द भक्ति ती अंध सोडुनी समयिं खरें वर्ता ॥ १९ ॥ कां उगीच वणवण करिता, । काबाडी काथ्या कुटतां ? । सगळेजण ब्राम्हण होतां ॥ कोणि न अडवी, कसोटि घ्यावी वाचुनिया गीता ! ॥ २० ॥ वर्णाश्रम धर्माला , ही । जातींची महती नाहीं, । श्रेष्टत्वां शीलचि नेई, ॥

सात्त्विक, राजस, तामस वृत्ती हीच खरी मत्ता ! ॥ २१ ॥ जो नामि सनातन नटला । तो धर्म एक जगिं आपुला । अति उदार तत्त्वें भरला, ॥ एक निर्मिता देव मान्य त्या, अंशभूत जनता ॥ २२ ॥ जें विकास मतिचा रोखीं । पातक तें समजा लोकीं; । मति विकास करुनी टाकी पुण्य सर्व तें, । त्या नच शिवते कधिंहि अशुद्ध कथा ॥ २३ ॥ घ्या सखोल अर्था हृदयीं, । शब्दछल पोकळ पाही, । अवघ्यांचें अनहित होई ॥ कोणी कुणाला पुसे न, याला तोड कशी करिता ? ॥ २० ॥ गीतार्थी तो यदुराणा वेदांचें सारचि जाणा । सांगे गुज, तें मनिं आणा ॥ शुद्र, स्त्री, तशी पापयोनि वा मुक्त शरण रिघतां ! ॥ २५ ॥

## पद १० वें

( चालः—सब्से राम भजन कर० । )

आयुष्याच्या पळापळाला कणकण ज्ञानाचा मिळवा, । जन हो, ज्ञानाचा मिळवा ॥ ध्रु ॥ आयुष्य गमे जरि फार तुम्हा कमि, त्याहुनि फारच सुख कमती ! । दुःखपूर्ण हा प्रपंच भासे, घाणा फिरतो या रीती ! ॥ तेंचि मिळुनिया शिक्षण कांहीं संस्कृत जरि तो होय मती, । ज्ञान देइ संतोष सदा मग, दावि सौख्यानेधि विपुल नवा. ॥ १ ॥ म्हणाल अमुचें कांहीं न नडलें आजवरि शिकलों जरि नाहीं, । आहे भरपुर खाया, त्यामधिं घालूं आम्ही भर कांहीं ! ॥ आजे, पणजे, वडिल आमुचे शिकले नव्हते अक्षरही, । धंदापाणी केलें त्यांनीं प्रपंच बडदा अधिक नवा. ॥ २ ॥ विचारसरणी प्रथमदर्शनीं गोड वाटली, चूक परि । मागिल तें युग विसरा आतां, मनांत मांडे खा न तरी; ॥ अशिक्षिताचें रामराज्य ना कधिंही झालें आजवरी, । रहाल आतां थंड असे, मग शेवट जवळिंच समजावा. ॥ ३ ॥ जीवनकलहीं चढा

ओढ ही अकलेची बहु आज पडे; । सुधारणेच्या लाटेसरसे बदला, ना तरि मरण घडे ॥ नित्य नवे हे शोध लागती, जग हें गेलें फार पुढें, । सर्व जगाच्या बरोबरीनें निभाव अपुला तुह्मि लावा. ॥ ४ ॥ पोटासाठीं शिकावयाचें नोकर व्हाया दुसऱ्याचें, । किंमत इतुकी कमी न याची, शिक्षण याहुनि मोलाचें. ॥ शाळा सांप्रत शिकवि तेवढें पुरतें शिक्षण नच साचें, । ज्ञानाची ती हांव ठेवुनी शिका, मिळे मग नवठे वा. ॥ ५ ॥ म्हणाल; ' येतो त्रास बहु परी ' लक्ष न लागे तिळ साचें । माथे फोडी दगदग भारी, सोपें ना मुळिं शिकण्याचें ! " ॥ प्रश्नाचें तरी उत्तर द्या या, ' श्रमाविणें जगिं सुख कंचे ? ' । ' श्रम ज्या पटिनें, सुख त्या मापें, ' उलट नियम जगिं मज दावा ! ॥ ६ ॥ आड खणावा मग तें पाणी, बीज रुजवुनी धान्य मिळे । वृक्ष राखण्या कष्ट करावे, मिळतिल तेव्हां गोड फळें; ॥ व्यवहारीं तरि, धंदा चाकरी, खस्ता खातां उदिम कळे, । आळसावारी शहाण्यानें कां स्वार्थ थोर हा दवडावा ? ॥ ७ ॥ शिकण्यासाठीं शिकल जेव्हां तहान लागुनी ज्ञानाची, । स्वर्गसूखही तुच्छ म्हणाया होय तयारी मग तुमची; तहानेनें जो व्याकुळ झाला गोडि तयाला पाण्याची । जिज्ञासू गणि तेवि निज मनीं ज्ञान हाच कीं मधुमेवा. ॥ ८ ॥ शिक्षण करितें विकास मतिचा, प्रफुल्ल हृदयीं मोद भरे । प्रगल्भबुद्धि नवचैतन्या घेऊनि खुलवी जग सारे ॥ चराचराचे अणुरेणू मग बोलुं लागती नवलपरें । जग हें दिसतें प्रेमें नटलें, दुःखा भासें नच ठावा ! ॥ ९ ॥ बहुरत्ना ही वसुंधरा, जग उघडें कोडें उकलाया; । ज्ञानरवीच्या तेजा वांचुनि कौतुक गेलें हें वाया ! ॥ विश्वनिर्मिता ज्ञानसंपदा थोर नभी ही पसरीया । चीज तयाचें होइल जेव्हां घ्याल समजुनी नवलावा ॥ १० ॥ जग हें कैसें ? जगन्नियंता कोण यामधीं दडलासे ? । जन्म कशास्तव आपण घेतला ? कोठुनि आलों ? तेंवि कसें ? ॥ ज्ञानाची ती अंतिम

रेषा रहस्य असलें उकलितसें, । 'भाग्यवान्' नर सौख्य भोगितें, सायुज्जाची खात हवा. ॥ ११ ॥

## पद ११ वें

( चालः—पहा पहा दिवस० फटका )

दिन कसे । कठिण बहु आले ग्रहदशेमुळें, 'राज्य चाललें, ' । मराठे भीती; ॥ तरि अजब तयांची छाती ! ॥ ध्रु० ॥ दख्खनीं । फितुरिच्या मुळें यवन घुसले, राज्य वेढिलें, रायगड गेला; हाय ! धरलें येसुबाईला ! ॥ गादिचे । राजाराम धनी, काळ जाणुनि, ठरविती मनीं । 'जिंजिसी जावें । मग कर्नाटक लढवावें. ' ॥ मसलता । करूनि चालिले कोण कोण भले, ऐका चांगलें, ' । खंडोबल्लाळ, । प्रल्हाद जो निराजी बाळ ॥ दाभाडे । खंडेराव, पुढें संताजि घोरपडे, तैसे अलिकडे । धनाजी जाधव । आणि शिपाई प्यादे जे साव ॥ १ ॥ असति जे । शूर मावळे। घेति ते बळे । वेष बावळे; । लिंग घालिती, । लिंगाईत जती बनती ! ॥ 'हिकमती । मराठे निसटले,' शहासि जंव कळे बहुत पीसाळे; । सोडी ताकीद । 'पकडावें देखतां जल्दी !' ॥ कानडी । मुलुख चालती यात्रेकरु किती, त्यांत हे जती, । बंगलुरा आले, । मग धर्मशाळेमधिं गेले;॥ लावुनि बिऱ्हाड बाजलें, दास धावले, राय बसविले, । पाणि घालिती मग हातपाय झणिं धुविती. ॥ २ ॥ टकमका पहात राहिले लोक आगळें नवल हें भलें हळुंच कुजबुजती 'हे कोणी वेषधर दिसती !' ॥ बातमी । फुटली चहुंकडे, पुसति कानडे 'कोण, कुणीकडे । जातसा सांगा ?' ॥ हे बोलती 'केली गंगा' ॥ मग तया । पडलि काळजी, बोले खंडुजी 'याक्षणीं आजी'

फोडुंया मेळा, । हा ढंग होय निराळा !'॥ सत्वरें । म्हणुनिया 'बरें,'। राजाराम फिरे सवेंचि उतरे। जिंजिच्या मार्गें। खंडोबल्लाळ राहिला मागें ॥ ३ ॥ चवकशी । करिति फौजदार, आले ठाणेदार, शिपाई तालेवार। मोंगली भारी; ॥ त्या कडक हुकम सरकारी ॥ ही दिसे। साधु मंडळी, मांडुनी चुली रसोई चालली, । थाट बरोबर। गळिं लिंग शंख हातिं थोर ! ॥ हटकिलें । 'कोठुनी आला ?। जें सत्य असें तें' बोला !॥ किती जणे । आहांत तुम्हि असे ? चालिला कसे ? बाकिची न दिसे। मंडळी पहिली, । ती कोण कुठें गेली?" ॥ ४ ॥ त्या क्षणीं ॥ लवुन अदबिनीं सांगती, 'अम्ही गरिब दक्षिणी यात्रेकरुं आहों। करूं रामेश्वर म्हणतों हो ! ॥ आणखी । बहुत मंडळी होति या स्थळीं, उठुनि चालली । उरकतां त्यांचे, । अम्हां कारण ना पुसण्याचें. । " ॥ शब्द हा मुळिंच मानेना त्यांचिया मना, लोककल्पना । पसरली न्यारी, । भर ठाणेदार त्यावर मारी ॥ म्हणुनिया । गांजणुक करी; दोन मण वरी दगड दे शिरीं, । डागण्या देई, । बहु मारी चाबकानेंही ! ॥ ५ ॥ तोबरे । लावी त्यापरी, त्यामधीं भरीं राख आणि भुरी । तिखट तोंडी । येण्यास कबुल ती गोष्ट लांडी ! निग्रही । लोक ते खरे, कुणि न बावरें, देति उत्तरें । एक जीं पहिलीं, जरि मान काळमुखिं गेली ! धन्य त्या स्वामिभक्तीची ! अढळ हिंमतिची ! अमित किंमतिची तत्वनिष्ट ही ॥ ही प्रीत स्वराज्यीं किति पाही ? ॥ सार्थकी । जन्म हे खरे ! हेच मोहरे कुळांतिल हिरे; । पुण्य तो कुसवा । जी माय वीर-प्रसवा ! ॥ ६ ॥ भागला । ठाणेदार मिया शर्थ करुनिया, बोलला तया । इतर दूतासी । 'द्या सोडुनि आतां यासी. ॥ हे खरे । वाटसरु गुणी, येत उमजुनी, उगिच ना कुणी । जाच हा सोशी, । ना ढोंग जिरे मजपाशीं!" ॥ चालिले सोडितां, पुढें दक्षिणेकडे लोक फांकडे, । गांठिती राया । सुखरूप जिंजिवर याया ॥ यापरी । नांव राखिलें

गादिचें भलें, सत्व आपुलें देति उजळोनी । जशीं बावन कशिचीं सोनीं ! ॥ ७ ॥

## पद १२ वें.

( चालः—या भरवुं संत० । )

हे गणराज, गौरि कुमरा ! विनंती माझी. ॥ ध्रु० ॥ मंगल उत्सव गाजत आला । जन प्रेमानें रंगुनि गेला । भाव प्रभो ! आदरा ॥ विनंति० ॥ १ ॥ हीन, दीन, मन दुःखीं दुबळें । आधिव्याधिनें गांजुनि गेलें । पूर्ण कृपा वितरा; ॥ वि० ॥ २ ॥ पोटासाठीं कष्टति नाना । मित्र मिळेना, शत्रु कळेना । कोण आम्हां आसरा ? ॥ विनंति० ॥३॥ ज्ञानावाचुनि पशुसम बनलों । भलत्यासाठीं भांडत सुटलों । न्याय तुम्हींच करा. ॥ विनंति ॥ ४ ॥ दिनदुनियेची दैना दिसता । अंत किती प्रभु आतां बघतां ? । द्या पदरीं थारा ॥ वि० ॥ ५ ॥ सज्जन संगमिं सेवा घ्याया । शिवकवि नयना मूर्ति दिसाया । या, अवतार धरा; ॥ विनंति माझी ॥ ६ ॥

## पद १३ वें.

( चालः—कां हरि वेणू० । )

बोल, प्रभुनाम बोल मना ! ॥ ध्रु० ॥ केशवा, नारायणा, माधवा, मदुसुदना, ॥ १ ॥ गोविंदा, हे विष्णो, श्रीधरा, त्रिविक्रमा, ॥ २ ॥ हृषिकेशा; पद्मनामा, दामोदरा, वामना, ॥ ३ ॥ वासुदेवा, अनिरुद्धा, संकर्षणा, पद्युम्ना, ॥ ४ ॥ अधोक्षजा, नृसिंव्हा, पुरुषोत्तमा जनार्दना, ॥ ५ ॥ उपेंद्रा, अच्चुता, हरिरूपा, श्रीकृष्णा. ॥ ६ ॥

## पद १४ वें.

( चालः—घ्या असहकार० । )

विघ्न हरायाला । गजानन बोला ! ॥ ध्रु० ॥ सांब सदाशिव उदार भक्ता । प्रेमळ मोठी गिरिजा माता । पुत्र प्रसवली मंगलकर्ता । संशय तो कसला ? । १ ॥ सर्वारंभीं गणपति पूजन । जनता करिते अनुभव घेउन । स्मरणें होती पापें निरसन । वराचि असा दिधला ! ॥ २ ॥ प्राणलिंग जें शिवस्वामीचें । रावण जातां घेऊनि साचें । हरुनि तें मग गोकर्णाचें । रूप दिलें त्याला ! ॥ ३ ॥ परमेशाच्या नांवापोटीं स्वार्थसाधु जे ढोंगी कपटी । सोंग आणिती काव्यासाठीं । त्या देतो टोला ! ॥ ४ ॥ भक्तिरंगिं जे रंगुनि गेले । अंतरिं वरती प्रेमाचि ल्याले । 'समाज हाची ईश ' बोलिले । मंगल त्या सकलां ! ॥ ५ ॥

## पद १५ वें.

( चालः—अहो दारूबाजी० । लावणी. )

काय सांगूं तुम्हा, हो सांगू तुम्हा ? । पुरे डौल हा रिकामा ॥ ध्रु० ॥ पूर्वजांची प्रौढी मारता हवी तेवढी । स्वतां तुम्ही कवडीच्या न याल कधिंही कामा ! ॥ पुरे डौल ० ॥ साहेबाच्या किती उद्योगाची स्तुति । करतां, परी सुस्ती तुमची स्वतांची मुळींच जाई ना ! ॥ पुरे डौल० ॥ ' उद्योगाच्या घरीं सिद्धि पाणी भरी ' । तुमच्याच्यानें परी पोटाशिवाय काडी हाले ना ! ॥ पुरे० ॥ सांगता गोड कथा ' टाकिं घावाच्या ' त्या, । घर कोंबडें स्वतां परहातींच पाणी पिताना ? ॥ पुरे० ॥ म्हणता, ' तत्वज्ञानी आमुचा धर्म जनीं, ' । शपथेला हो कुणी ग्रंथ उघडून कधीं बघा ना ॥ पुरे० ॥ ' संघटन व्हावें, लोक

मेळवावे, '। सांगता लांब नांवें, झीज स्वप्नांत तुमच्या येईना ! ॥पुरे०॥ कोणि करूं जातां, नाक मुरडीता । कधिं उत्सूकता सर्व जन्मांत तुम्हा सुचेना ! ॥ पुरे० ॥ स्वतां कोरडे पाषाण, दुसऱ्याचीहि घाण । करतां वाटे सन्मान जणुं गटारगप्पिकांना ! ॥ पुरे० ॥ आळसानें होतें, डोकें पोकळ तें । सैतान घाली तेथें मग कुचाळ कारखाना ! ॥ पुरे० ॥ वर्तमानी गप्पा मारतां वेळ सोपा । करणी मात्र झोंपा ! तुमच्या हांतून कांहींच होई ना ! ॥ पुरे० ॥ 'यानें काय होणार ? त्यानें काय होणार ?' म्हणतां, हातीं घेणार तुम्ही भोपळाच अखेर, होय ना ? ॥ पुरे डौल हा०

## पद १६ वें.

( चालः---रेडिंग जादूगार आतां० । )

दारूपायीं ठार झाले, दारूपायीं ठार रे । कितीक अब्रुदार झाले दारूपायीं ठार ! ॥ ध्रु० ॥ बलाढ्य राक्षस इंद्राहूनी; शुक्रापाशीं मंत्र संजिवनि । गेले गेले पार ! रे ॥ १ ॥ शिवरायाचे पुत्र वीरमाणि संभाजी, जणुं शेर दख्खनीं, ! झाला अंधःकार ! रे ॥२॥ कविताभूषण शाहिर मोठे । गडकरि; परि त्या बाटलि भेटे, । मुकला मग संसार ! रे ॥ ३ ॥ विलायतेची दिवाळखोरी । दारूपायीं बसली दारीं, गेलें तें घरदार ! रे ॥ ४ ॥ परदेशाची भरती करुनी । फॅशन घेतली सुधारकांनीं, । झाले थंडेगार ! रे ॥ ५ ॥ कसबी कारागिरही खंदे । पैसेवाले हीचे बंदे । फिरती दारोदार ! रे ॥६॥ मोठ्यांची ही हाल, अवस्था ! । मजुर, भिकारी कां रे पीतां ? । होतिल चिपळ्या चार ! रे ॥ ७ ॥

## पद १७ वें.

( चालः—जसा रंग श्रीरंग० । पोवाडा )

रणीं शूर अनिवार पेशवे पहिले बाजीराव, ॥ अहो राव ॥ स्वामिजवळिं सेवेसि सज्ज जंव, थरथरती मनिं उमराव ! ॥ ध्रु० ॥ काय जहाली मात तयांच्या विशाल अमदानींत ॥ छत्रसाल नृप राज्य करितसे बुंदेलखंडांत ॥ दिल्लिपती त्या समयिं धाडि तो बंगष महंमदखान । सुभेदारिवर माळव्यांत कीं, सत्वर निवडुनि छान ! ( चाल बदलून ) छत्रसाल बहु दुर्बल राजा । होता दम खान ताजा । घाली झणिं त्यावर फौजा ॥ दोन पुत्र जरि निर्बळि ठरले, छत्रसाल ये घोरांत । " स्वराज्य जाउनि गुलामपण तें येइल कीं पदरांत ! ॥ १ ॥ इतुक्यामध्यें स्मरण जहालें । बाजिराव ब्राम्हण वीर । शिव हिंदुपदपातशाहिचे सेवक बहु खंबीर " ॥ ११ ॥ काय युक्ति करि वृद्ध चतुर तो राजा अनुभवशीर, । शंभर दोहरे रचुनि पाठवी यादी नमुनेदार ! ॥ चाल० ॥ " गोब्राह्मण प्रतिपाळी जी । गादी ती रक्षुनि, बाजी । चहुंमुलुखीं झाला गाजी; ॥ वृद्ध स्वजन परि नृप जिंकुनि हा मोंगल बुडविल नांवा ! । 'नक्रापासुनि सोडवि श्रीपति गजेंद्र' त्यापरि धांवा. ॥ २ ॥ शहर पुण्यामधिं बांधित होते वाडा जों शनवार । तोंच पाहती यादि पेशवे करुण पूर्ण वारंवार ! ॥ कळवळलें मनिं पेंच पाहुनि बाजीराव अति दिलदार । क्रोध वाटला खानाचाही जुलुमीच ज्याचा जोर ॥ चाल० ॥ लगबग मग करिती थोर । संगे जो दळ बडिवार । तांतडिनें झाला स्वार, तीर सुटावा कमानिपासून दौड तेवि सहज । हृदयिं स्फुरें वच 'बुंदेल की सो राख बाजि लाज' ॥ ३ ॥ अबलक घोडे तुफान झाले नर्मदेसि नदिपार । बंगष मांडी ठाण, तयासी नजिक जैतपूर. ॥

गनिम घेऊनी अंगावरती, भिडती मग फौजा। मर्द मराठे हातघाईनें करितील रणिं मौजा ! ॥ चाल० ॥ चढले मग जव अवसान। मोंगल हो दाणादाण। हैराणहि महंमदखान ॥ शिकस्त करुनी धीर निघेना, बंगष अटपी रान; । फौज दशादिशा, आपण जगवी जीव पळुनि खान! ॥ ४ ॥ पाहुनी विजयी वीर बाजिला छत्रसाल गहिंवरला। आलिंगुनि त्या वदे 'अजि खरे पुत्र तुम्हिच मजला ! ॥ वृद्धपणीं मम म्हणुनि वाटितो राज्य तीन भावां। औरस पुत्रा दोन भाग हे' तिसरा तुम्हीं घ्यावा ! ' ॥ चाल० ॥ गौरवि मग राजा पाही। शिपाई मराठे भाई; बहादुरीची बक्षिसी काई ? ॥ हिंदुशाहीला अडिच लाखवर मुलुख नजर केला। पवित्र झांशी आणिक त्याशी मिळवि बाजि अलबेला ॥ ५ ॥ नांव काढिती यांत गाजवुनि वीर घोर तलवार। प्रमुख त्यामधीं गोविंदा जो खेर बारगीर; शागिर्दीचा हुद्दा असुनी तडक दावि थोर। बुंदेले झणिं पदवी पावे, मिळवी तशी जहागीर ॥चाल०॥ पहिले नर कडवे ऐसे, ॥ धनि त्यांचे पारखि तैसे, । गुणग्राहक अस्सल खासे; ॥ स्वराज्य काळीं दोष बहुत जरि, गुणासि अतिवाव। हीन पुरुषही कमवुनि गेले प्रसंगिं किति नांव ! ॥ ६ ॥

## पद १८ वें.

( चालः—बघुनि त्या भयंकर०। )

सज्जना ! विचारी स्वमना। 'गाय कां दिसे जगिं आम्हा' जाशि दुसरी माता अपुली ?। ना गुणां तिच्या मुळिं सीमा ॥ ध्रु० ॥ गोधनीं दूध जें दुभतें। अमृता लाज आणवीतें; ॥ पोषक जें आरोग्यातें। पंचगव्य तें सुख देतें. ॥ १ ॥ गरिबास जळण शेणीचें। शेतास थोर खत त्याचें; ॥ गोमूत्रीं गुण मोलाचें। औषधी वैद्यकिंत साचे!

॥ २ ॥ पाडसें -बैल—जे वी ती ॥ जनतेस कोण सुखवीती; ॥ देशी या अवघी शेती। त्यांचिया जिवावर हो तीं !॥ ३॥ बैल हा भार किति वाही। मोट वा फिरवि घाणाही ॥ जुंपुनियां चैनी जाई। पाणीहि तसें कुणि नेई ॥ ४ ॥ कापडी आणि ती गठे,। पोतडी भरीती मोठे ॥ राजे वा हुन्नरी शेठें। बैल ना तया तरि तोटे ॥ ५ ॥ सर्वची गाय दे सहजी। कां तिच्या गुणाना राजी ?॥ विशेष कां संव्हा रुनिजी। मानितां स्वतांला गाजी ! ॥ ६ ॥ करुनिया गुन्हा हा ताजा मानिता प्रभूची पूजा ? ॥ जीवन तें खोटें समजा। गलत या जगां-तिल गमजा ! ॥ ७ ॥ निर्मि जो प्रभू ही सृष्टि। लाडकी सर्व त्या मोठी ॥ सर्वांना सारखि दृष्टि। क्रूरता जिरेल न पोटीं ॥ ८ ॥ मानवें बुद्धिचीं पेवें ! निर्मिलीं जगीं जीं देवें ॥ त्यांनीं कां हरहर ! घ्यावे। राक्षसी जिभने चावे ! ॥ ९ ॥ जीत कीं साजिव दुनिया ही। जीव तो जिचा तिज प्यारा; ॥ जें अपुलें सुख ना चोरी। पिशुनता तिथें तरि वारा ! ॥ १० ॥ उपकारी किति गो ऐशी। लीनता पुन्हां तिज तैशी ॥ सात्विक ती मुद्रा कैशी। देवता हिंदुसीं जैसी ॥ ११ ॥ गुण जिचे अमोलिक दिसती। दिव्य ती ईश्वरी विभुती ॥ ईश्वर हा सर्वांभूतीं। धर्मि ही सनातनी ख्याती ॥ १२ ॥

## पद १९ वें.

( चालः—ईश्वराची दया०। लावणी )

तराजूची तरवार झाली ॥ हो, **टोपिवाल्यांनीं** बहार केली ! ॥ ध्रु० ॥ चार होते विलायती वाणी, ॥ मुंबईस आले तोडून पाणी। हिंगजिरेमिरें विकलें त्यांनीं ॥ वखारीची चलती झाली, झाली !॥ हो टोपि० ॥ १ ॥ देशि राजे करीत होते लूट, ॥ म्हणून त्यांनीं बांधला

भौंवति तट ॥ शिपायी, पहारा, केली खटपट ॥ थोडी फौज खडी झाली, झाली ! ॥ २ ॥ देशामध्यें भांडत होते लोक । त्यांच्यामधीं पाडलें यांनीं भोंक ॥ वाट करून साधलें आपलें सुख ॥ आपली फौज व्याजीं दिली, दिली ! ॥ ३ ॥ भाऊबंदकीसाठीं मदत केली ॥ देशि फौज देशामधीं मेली ॥ त्याचे व्याज जमीन हातीं आली ॥ सावकारी छान झाली, झाली ! ॥ ४ ॥ घरचा मालक झाला केविलवाणी ॥ त्याला पाजलें शांततेचें पाणी ॥ पाहुणा झाला तेथें घरधनी ॥ प्रजा साफ सुखी झाली, झाली ! ॥ ५ ॥ देशी ताठा असे फार मोठा, ॥ अकलेचा दिसे परि तोटा, ॥ भांडणाचा फिरे वरवंटा, ॥ कुरघोडी मग झाली, झाली ! ॥ ६ ॥

## पद २० वें

( चालः—आनंदकंद ऐसा० । गजल )

मयुरेश देव माझा । आनंदरूप राजा० ॥ ध्रु० ॥ कोणासि ब्रह्म भासें, । ॐकार मूर्ति विलसे; ॥ आम्हांसि तोचि समजा । आनंद० ॥ १ ॥ ब्रह्मांड निर्मिता हा । शंभूहि हाच पाहा, ॥ विष्णू न कोण दूजा ॥ आनंद० ॥ २ ॥ जगतीं अनंत जाती । भक्तींत भिन्न रीति ॥ परि त्यांत सत्य योजा । आनंद० ॥ ३ ॥ कोट्यावधी मतांना । फल एक धर्म नाना; ॥ परि हाचि ज्ञानकाजा । आनंद० ॥ ४ ॥ तेहतीस कोटि मूर्ति । एकांत येथ वसती । शिवकविही नमित तेजा । आनंद०॥५॥

## पद २१ वें

( चालः—एडका मदन तूं० । )

खरा सुखकंद । करूं प्रसन्न गुणगोविंद ॥ ध्रु० ॥ करुणासागर

हा जगजेठी । धांवत येई भक्तासाठीं । संकट कुठचें मग त्या पाठीं ? । होइ स्वच्छंद ! ॥ १ ॥ कोंवाळि काया प्रल्हादाची । पर्वत सुद्धां मुळिं ना ठेची !। मरणवेळ ही ध्रुव बाळाची । केलि कीं बंद ! ॥ २ ॥ मस्त हत्ति तो नक्रें खिळिला । त्याचा टाहो कांनीं आला । हत्ति नव्हे, परि मगरहि केला । मुक्तभवबंध ! ॥ ३ ॥ वर्णु किती अनुपम लीला । तीन्हीं लोकीं त्रिकाळ झाल्या । जीव जातिमधिं उदंड शिरल्या । कीर्तिनें कुंद ! ॥ ४ ॥ हरि भजनाचें प्रेमळ गाणें । भक्तीचें हें सुंदर लेणें । शिवकविलागीं प्रभुचें देणें । होइ मन धुंद ! ॥ ५ ॥ करूं प्रसन्न० ॥

## पद २१ वें

( चालः—पांडवा सम्राट पदा० । गजल )

दोशि माला वापरोनी देश आपुला वांचवा ॥ बांधवांनो, झोंप टाका, स्वाभिमाना जागवा ॥ ध्रु० ॥ सूवर्ण भूमि देश होता, रंक झाला आज कां ? ॥ शोध याचा मनिं करा हो, तर्क आपुला चालवा ॥ धान्य होतें, वस्त्र होतें, सर्व होतें दोशि या ॥ आज येथें घांस मिळण्या होय आम्हां वानवा ! ॥ खंडोगणती माल कच्चा देश पिकवी सर्व हा ॥ विकुनि परि तो पराकि लोकां, स्वस्थ खातों आम्हि हवा ॥ चौपटीनें पराकि नेती श्रम करोनी त्यावरि ॥ पराकि मालासाठीं पैसा कोण जातो रोज हा ! ॥ शिकुनि हे श्रम आपण करितां, येई तोटा ना कुणा, ॥ माल आपुला आपण घ्यावा, द्रव्य घरचें सांचवा ॥ आगपेटी पासुनी ही सर्व कांहीं देशी घ्या, ॥ दीनदुबळे, शेठ श्रीमंत विनति स्वमनीं वागवा ॥ भगिनि माता, तुम्हीहि सगळ्या देशी वस्तु मागवा ॥ साडी चोळी, बांगडी कीं, कुंकूं, अंगडीं, पोत वा. ॥ ‘ एकट्यानें काय येतो देश वरती ? ’ जरि म्हणा, ॥ मंत्र कानीं एक

कथितों हृदयिं अपुल्या खोदवा, ॥ “ प्रत्येकाच्या गृहिं स्वदेशी, सर्व गांवा सहज ये, ॥ ‘ दसकी लकडी ’ होय बोजा, सर्व जगिं ती वाहवा ! ” ॥

## पद २३ वें.

( चालः—सुरासुरां जणुं असे० । )

उठा उठा, रणिं शिंग फुंकुनि जागृत मेदिनि करा झणीं, ॥ आणि बाणिवर हिंद भुवनि घ्या, ‘ नव युवकानों ’ स्फुरण मनी ! ॥ धृ० ॥ अखिल भूतळीं एकच उसळी तरुणरक्त आजि आभिनव घे ॥ रस्सिखेंच ही माजुनि राही, आतां मागें कोण बघे ? ॥ कृतांत काळा भिडवुनि डोळा पूर्वज गेले चमकोनी, ॥ त्याच वोलिचे अंकुर आजिचे मागें घ्याल कीं काय, तुम्हीं ? ॥ ‘ प्रचंड भारती संगर ख्याती पुराण काळीं, ’ जन बोलें ॥ ‘ उदंड शक्ति अजुनीही नांदे ! ’ गर्जुनि सांगा बाहुबलें. ॥ सनातनी आम्ही आर्यधर्मी, या हिंदभूमिला भूषविली; ॥ कसाहि वारा वाहो तरि ही पाठ कधींना दाखविली ! ॥ मोंगल आले, गिलचे गेले, पोर्तुगीज वा बौद्धमुनी ॥ काळ जिंकुनी धर्म राखि हा संस्काराचे शुद्ध मणी ! ॥ वेदतत्व जें अजिंक्य, त्याची आद्य शंकराचार्य प्रभा ॥ उजळिति, माया बुद्धगुरूची पळविती, शुकमुनि जशि रंभा ! ॥ शास्त्रिय ख्याती अध्यात्मिकि ती अजुनि, जगं किती त्या भाळे ! ॥ उगम स्थान हें सकल कलांचें, संशोधनिं हें सत्य कळें ॥ परिणत रीती, उदारनीती नांदत होती केवढि ही ! ॥ पर प्रांतांचे लिहिति फिरस्ते, साक्ष परस्पर ती घ्यावी. ॥ भारत रमणी, तेवि नरमणी कोंदिति यशध्वनी चहूंकडे; ॥ धर्मयुद्ध वा राजनीतिचे येथुनि घ्यावे अजुनि धडे ! ॥ रामरावणीं कंसिं यदुमणी, पांडव गुरुगाणिं झुंज किती ॥ रजपुत यवनीं, पाश्चिमात्य जनिं अजवर झाली हरजित ती; ॥ इतिहासाच्या पानोपानीं पराक्रमाचा जो वारा ॥

रा. क.

ब्रीद आपुलें अठवुनि पहिलें, कायम राखा तो तोरा. ॥ अधुनिक रीतीं लढण्यासाठीं पांचपेंच नव मोहरे वा ॥ समय राखुनी वर्ताया झणिं, सरंजाम हा पेहेरावा. ॥ काळ फिरे जइं जगही बदलें, संग्रामाचा रंग नवा ॥ उडी घालण्या त्यांत तयारी दंड ठोकुनी तुम्हीं दावा ! ॥ पुनित स्थलांनीं, धनधान्यांनीं, समृद्ध भूमि गांजलिसे; ॥ पुत्र तियेचे होतिल कैचे, कठिण समय जरि, भ्याड असे ? ॥ गुलाम बनणें भाळीं आलें, बिशाद याची काय परी ? ॥ खिळिला बच्चा सिंव्हाचा जरि, स्वभाव सोडिल काय तरि ? ॥ प्रसंग बांका पडे, म्हणुनि कां कालचक्र हें थांबतसे ? ॥ आज खालती येतिल वरती अरे उद्यां, हा नियम असे ॥ राष्ट्रमणी जे तळपुनि तेजे अमर जाहले आर्यकुळीं, ॥ 'वंशज त्यांचे जिवंत आहों !' दावुं जगाला याच स्थलीं ॥ आळस पहिला झाडुनि सगळा, हांक फोडुनी तीव्र स्वरें ॥ शेळ्यामेंढ्या मानिति नर, त्या स्वरुप दाखवूं उग्र स्वरें ! ॥ खडबडुनी स्वीय तुतारी फुंकुनि या परि, दुर्भाग्यावरि करुं स्वारी ॥ जग पाहिल लगबग, ईश आपुला कैवारी ! ॥ तरवारीच्या धारेवरती नाचायाला भिऊं न आम्ही ॥ "स्वार्थासाठीं जगण्यापेक्षां राष्ट्रासाठीं मरुं नामी !" ॥

## पद २४ वें

( चालः—नाचत ना गगनांत० । )

मंगल हा प्रभुराज माझा । अवतरतो आनंदकाजा ॥ ध्रु० ॥
कामापायीं आटलें सर्वही । क्रोधसारखा करि जधिं येजा ॥ १ ॥
लोभापायीं खाऊनि सगळें । वरती नर जधिं पीति लाजा ॥ २ ॥
'माझें माझें' करुनी नर जें । मोहाचा बहु बांधिती बोजा ॥ ३ ॥

सत्ता वैभवसंपत्तीनें । मदांध जन जधिं मारिति मौजा ॥ ४ ॥ मत्सर करितां वृद्धहि होती । फड नासाविण्या येति माजा ॥ ५ ॥ दुष्टपणाची उपटुनि हरळी । पुरवित प्रभु हा सोज्वळ चोजा ॥ ६ ॥

## पद २५ वें

( चालः—वसंती वधुति मेनकेला० )

पुसे जरि कोणि मला आतां । ' धर्मि कोणता ग्रंथ मानिता ? ' वदेन मी ' गीता ! ' ॥ ध्रु० ॥ असति जरि चार वेद पहिले । शास्त्र सहा, वा पुराण अठरा, सार तया गीता ! ॥ १ ॥ विरोधी एकमेक दिसले । ग्रंथ जरी हे, एक वाक्यता आणिल त्या गीता ! ॥ २ ॥ मुनींचे पंथ जरी गमले । ईश प्राप्तिचे अनेक भ्रम हा निरसिल कीं गीता असो तो कोणि, कुठिल ज्ञानी । तत्वज्ञान तें अगाध उघडुनि, चकित करिल गीता ! ॥ ४ ॥ नसें जें ' कुराण, बायबलीं ' । समाधान सुख निःशंकाचें, खचित देइ गीता ॥ ५ ॥ ' उदासिन धर्म ' कुणी वदती, । ' कौशल्याचा कर्मयोग ' परि शिकवि खरा गीता ! ॥ ६ ॥ असक्तिं मुळिं ना ठेवीतां, प्राप्त भोग ते भोगि सुखें, हें उपदेशी गीता ! ॥ ७ ॥ म्हणा कुणि ' राजयोग, यासी । भक्तिमार्ग, वा न्याय पंथ हा; ' कामधेनु गीता ! ॥ ८ ॥ अखिलहि वर्ण जाति पंथा । आत्मोद्धारा मार्ग विशद करि नियमबद्ध गीता ! ॥ ९ ॥ " जिथें मन योगयुक्त असुनी पराक्रमी कर स्फुरे तिथें चिर विजय; " वदे गीता ! ॥ १० ॥

——

## पद २६ वें

( चालः—मज समीप किमर्थ आलां ! )

नच तुम्हासि अजूनि कळलें । कसें ? पिसें दिसें जडलें ! ॥ धृ० ॥
अजुनि तरी दुही मोडुनि काढा । माजवितां रण कसलें ? ॥ १ ॥
अखिल समाजीं एक घटक तुम्हि, कां निघतां फुटुनि बळें ? ॥ २ ॥
इतर जनांसी तुच्छ लेखिता, । तुम्हिच असे गुणि कुठले ? ॥ ३ ॥
सकल जनांहुनि विशेष तुम्ही । ध्वज कसले लावियले ? ॥ ४ ॥
तुसडे बनतां, कुणि न विचारी । गुण लपती असलेले ! ॥ ५ ॥
स्वाभिमान हा फुकट मिरवितां । नालायक तुम्हि ठरले ! ॥ ६ ॥
अहंमन्यता कवटाळुनि मनिं, । फोल जिणें तुम्ही केलें ! ॥ ७ ॥
मीं मी करूनी रावण नडले, । सुयश तुम्हा तिथ कसलें ? ॥ ८ ॥
मानासाठीं हपापतां जगिं । किर्ति खरी दूर पळे ! ॥ ९ ॥
लीनपणें करि समाज सेवा । सहज तया किर्ति मिळे ! ॥ १० ॥
यास्तव, जनता देव समजुनी । सेवक व्हा तुम्हि पहिले ॥ ११ ॥
' लोकसंग्रहीं समाजभक्ता । देवपणा ये काळें ! " ॥ १२ ॥

## पद २७ वें

( चाल राजहंस माझा नि० । )

आर्यांची वैभवशाली रणरांगिणि झांशीवाली ! ॥ धृ० ॥
झांशीची लक्ष्मुमि देवि । अवतारी होऊनि राही ! ॥ ललनांची सोज्वळ कीर्ती ! । केवळ ती पुतळी होती ! ॥ ( चाल बदलून ) जातीची अबला असतां । लाजेना लिहितां शिकतां । धोड्यावर उठतां बसतां । वीरांची विद्या शिकली ॥ रणरंगिणि० ॥ १ ॥ पदवीनें राणी, होती ।

विधवा, परि शहाणी हो ती ! ॥ ती स्वतःच राज्या हाँकिती, । न्यायाची जळती ज्योती ! ॥ चाल ॥ ताठ्यानें नाहीं फुगली । तोऱ्याला भीक न घाली । सत्तेनें सारखि दिसली; । गुणवंता वाली झाली ! ॥ रणरंगिणि० ॥ ४ ॥ शत्रूंनीं वेढा दिधला । चहुंकडुनी गहजब केला ॥ डंक्याच्या नौबदि झडती । तोफांचे गोळे उडती ॥ चाल ॥ मग जमवी कडवे वीर, । घोड्यावर झाली स्वार, । तट फोडी उघडी द्वार, । महिषासुर मर्दिनि बनली ! ॥ ३ ॥ शत्रूवर वाघिण भिडली । निमिषामधिं सर्वां उधळी ! ॥ पर्वा ना तिजला कसली । वीरांना धडकी बसली ! ॥ ( चाल ) धीरांना कापी हुथडी । शत्रूची फाळि ती फोडी चौखूरी घोडा सोडी । अडवाया छाती कुठली ? ॥ रणरांगीणि० ॥ ४ ॥ अन्नाचा घांस न गिळितां । रात्रंदिन जाळी चिंता; ॥ विश्रांति मुळिना कसली, । दिनराती लढता थकली ! ॥ ( चाल ) गनिमांनीं कावा रचिला, । बहुतांनी मारा केला ॥ दैवाचा झोला तुटला । स्वातंत्र्यासाठीं मेला ! ॥ रणरंगिणी० ॥ ६ ॥

## पद २८ वें.

( चालः—गौळणी सांगति० । )

गणपती माझा तुह्मि पहावा, ॥ मोदक लाडू त्या द्यावा ॥ ध्रु० ॥ सगळे मिळुनी जाऊं या, ॥ गणपतिचे गुण गाऊं या; ॥ आनंदाचा तो ठेवा ॥ मो० ॥ १ ॥ विद्या देई लहान मुलां, ॥ सकलांना तो लावि लळा; ॥ भावानें बहु पूजावा ॥ मोदक० ॥ २ ॥

## पद २९ वें.

( चालः— छक्कड, )

आपुला गणपति किति मजेदार ? ॥ अहो, याच्या गळयांत मोत्याचा हार ! ॥ अरे हा बघ ॥ ध्रु० ॥ थाटांत सोंड काशि रुळे झोंकदार; ॥ पहा याचें रूप किति दिसें गुलजार ! ॥ अरे हा बघ. ॥ १ ॥ अंगावरि शेला मोठा असे हिरवा गार, ॥ मांडिवरि हात ठेवि कसा डौलदार ! ॥ अरे हा बघ ॥ २ ॥ हातांत मोदकाचा गोळा घोंसदार; ॥ बघोनि माझ्याकडे हंसतोय फार ! ॥ अरे हा बघ० ॥ ३ ॥

## पद ३०

( चाल—कटावासारखी बँडची )

सत्वधीर, कर्मवीर, प्रसवि शूर बहु परी । **आर्यभू** उदंड धन्य माय आमुची खरी ! ॥ ध्रु० ॥ उत्तरेस **पर्वतेश** रुद्र दक्ष रक्षणीं, । सेतु कां **सिलोन** केशपाश दिव्य दक्षिणीं, ॥ पूर्वप्रांति वंगकांति स्वर्ग शांतिचे परी, । पश्चिमा **हलासुलासि** **सिंधुही** खडा करी. ॥ तुंग हे उभे कडे । नीर त्यांत सापडें ॥ तें खळाळुनी पडे । जागजागीं वांकडे !॥ विपुल धान्य, शास्त्र मान्य, छात्र धन्य जी वरी, । हेमनाथ पुण्यधाम हिंद एक भूवरी ॥ १ ॥ चंड पुत्र हे प्रचंड जन्मवूनि संगरीं, । दुष्ट, जोर, शत्रु घोर, क्रूर, थोर संहरी ! ॥ कन्यकाहि देति ग्वाहि तेवि दाहि दिशिं पहा, । करुनि कीर्त संगरांत, सातियशांत ताशि महा ! ॥ सावित्री **अरुंधती**, । **द्रौपदी**, **यशोमती**, ॥ **अहिल्या** गुणी भली, । **पद्मिनीहि** झळकली, ॥ कंदनांत रिपुगणांत शक्ति मूर्त भासली । **लक्ष्मी**, तशी रणीं करुनि कराणि हरपली ! ॥ २॥ **राम रावणार्थ**

येत, कृष्ण कंसकंदना, । भोज, पृथ्वीराज, तो प्रताप क्षात्रमंडना, ॥ सिंहसा शिवाजी, शूर बाजी ये रणांगणा, । स्वार्थत्यागि, स्वामिनिष्ट झटति राष्ट्रमोचना! ॥ शूरवीर मावळे, । प्रभुमणीहि चमकले, ॥ अटक पार जिंकिली! । सकल जाति समबली. ॥ शिंग फुंकुनी, तुरंग दंगलींत उतरी । बापु गोखले, असे खरे हिरे किती तरी! ॥ ३ ॥

## पद ३१ वें

( चाल:—मजा देते है० । कवाली )

प्रभु भक्ताचा हा फार अभिमान वागवि चित्तीं! ॥ ध्रु० ॥ जगिं अभंग शुम तुकयाचे । जरि नदींत बुडवायाचे । करि डाव, खळ, कपटाचे; । प्रभु स्वतांच आणि वरती! ॥१॥ ये मुजुमदार रगडाया । चहाडीनें दामाजीला, परि स्वतांच खाई टोला; । प्रभु करीत रसीद भरती! ॥२॥ स्थळ काळ भजका नाहीं, । प्रभु सदैव सन्निध पाही; ॥ अनुभवून काया वाही । शिवकवीहि चरणा वरती. ॥३॥

## पद ३२ वें

( मारुतिस्तोत्र.—वृत्त—चामरा. )

रूद्ररूप, वज्रमुष्टि, भीम काय मारुती ॥ वायु पुत्र, दिव्यगात्र, तेजमात्र आकृति ॥ भ्रष्ट कृत्य, दुष्ट दैत्य, नष्ट भीत ज्याप्रती ॥ रामपाद भक्तराज धन्य, त्या असो नती ? ॥ १ ॥ जन्मतांचि तप्त बिंब फोडण्यासि जो उडे, ॥ बापुडे, तयापुढें न काळदंड हो खडें, ! ॥ स्कंद भागिं विश्वधीर; रामवीर राजती ॥ रामपाद भक्त० ॥२॥

भांड भांडुनी प्रचंड अग्निकुंड पेटवी; ॥ उग्रतुंड दैत्यपुंड त्या फुटींत लोटवी ॥ शत्रुकोट काटि नीट, भेटवी सितासती ॥ रामपाद० ॥३। एकमांड घे उलांड; सिंधु दांड खंडिला ! ॥ द्रोण दंड शैलचंड खंडसा उखंडिला ! ॥ नाम मात्र 'स्वीय तंत्र हो स्वतंत्र !' हें कथी, ॥ रामपाद० ॥४॥ हीन, दीन, खिन्न, लीन जे अशा खरा ॥ वज्ररूप हानुमान होई खास आसरा; ॥ सत्व, शक्ति, भक्ति, मुक्ति, देऊं कांति संप्रती , ॥ रामपाद० ॥५॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ४२५२
REFBK-0004252
REFBK-0004252

॥ शुभं भवतु ॥

ॐ

सांप्रत मु० खरवली ता. माणगांव येथें,
असलेला **डॉ० एस. एस. कारमरकर** यांचा
अगदीं थोड्या काळांत अत्यंत लोकप्रिय झालेला–

# आरोग्याश्रम.

–लक्षांत ठेवा; कारण या अनुभविक दवाखान्यांत–

| | |
|---|---|
| इटलीची | इलेक्ट्रो होमिओ |
| जर्मनीची | बायोकेमिक |
| देशी ( वनस्पती ) | आयुर्वेदिक |

इत्यादि यशस्वी पद्धतीवर फार काळजीपूर्वक इलाज केले जातात.

निर्वाणीच्या बिकट परिस्थितीतिही सुयश संपादन केल्याची निवडक **प्रशंसापत्रें** व **बक्षिसें** समक्षाच पहा !